

# किराणा वाटून कुणी लोकप्रतिनिधी होत नसतो!

आश्वासक नेतृत्व म्हणजे प्रिती बंड

जाणता उमेदवार देण्याची ही बडनेरा मतदारसंघाला संधी

स्टार प्रचारक नैना कडू यांची 'दै.महासागर' ला विशेष मुलाखत

**महासागर प्रतिनिधी**

*अमरावती,( दि.15 )- मतदारसंघातील जनतेला किराणा वाटून पाच वर्ष आमदारकी भोगणारा माणूस कधी लोकप्रतिनिधी नसतो. बडनेरा मतदारसंघातील लोकांपुढे आश्वासक नेतृत्व म्हणून प्रिती बंड या उभ्या आहेत. तळागळातला जाणता उमेदवार निवडून देण्याची ही बडनेरा मतदारसंघाला संधी आहे. या संधीच सोनं जनता जरुर करेल, असा पोलादी विश्वास आ.बच्चू कडू यांच्या पत्नी व स्टार प्रचारक नैना कडू यांनी 'दै.महासागर' ला दिलेल्या विशेष मुलाखतीदरम्यान व्यक्त केला.*

बडनेरा मतदारसंघात निवडणूकीचे रुपांतर जनआंदोलनात झाल्याचे पहायला मिळत आहे. अपक्ष उमेदवार प्रिती संजय बंड यांच्या प्रचार सभांची जबाबदारी नैना कडू यांनी उचलली आहे. या मागिल कारणही त्यांनी या मुलाखतीदरम्यान स्पष्ट केले.

**प्रश्न-प्रिती संजय बंड यांच्या प्रचारात उतरण्याचे काय कारण?**

**नैना कडू-** शिवसेनेचे माजी आमदार दिवंगत संजय बंड यांचा लोकसंपर्क अखंड होता. त्यांनी निवडून आल्यावर आमदारकी काय असते हे दाखवून दिले. त्यांचा लोकसंपर्क अखंड होता, ते जनतेपासून कधीच विन्मूख राहीले नाही. संजूभाऊ अचानक गेले हे आपले दुर्दैव आहे, मात्र संजूभाऊंनी केलेल्या कामाची जाणीव पत्नी म्हणून प्रितीताईंना चांगली आहे. प्रिती बंड या सुशिक्षित, सामंजस्य, लढाऊ बाणा असलेल्या महिला आहेत. त्या बुद्धीमान आहे, आजच्या वर्तमानाबाबत त्या सजग आहेत. लोकशाहीमध्ये लोकप्रतिनिधी कसा असला पाहीजे, असा जाणता उमेदवार देण्याची ही बडनेरा मतदारसंघाला एक संधी आहे. फक्त किराणा देवून कुणी लोकप्रतिनिधी होत नाही, तर एक आश्वासक नेतृत्व असणे गरजेचे असते, ते नेतृत्व करण्याची योग्यता प्रिती बंड यांच्यात आहे. महिला म्हणून मला हे सांगणे महत्वाचे वाटते, की ही माती अहिल्याबाई, जिजाऊंचा वारसा सांगणारी आहे, स्त्री सुध्दा सक्षम असे प्रशासन सांभाळू शकते, हे आपण पाहत आलो आहे. याच मातीतील एक महिला चुकीच्या व्यवस्थेविरुध्द रणशिंग फुंकत असेल तर आपण त्यांच्या पाठीशी उभे राहणे गरजेचे आहे. म्हणून मी त्यांच्या प्रचार करित आहे.

**प्रश्न-त्यांची उमेदवारी पक्षाने ऐनवेळी रद्द केली, याचा काय फरक पडेल?**

**नैना कडू-** त्यांना तिकीट मिळाली असती तर हे 'त्या' पक्षाचं सुदैव राहीलं असतं. तिकीट नाही मिळाली म्हणून त्या उमेदवाराचं सामर्थ्य कमी होतं नसते. फक्त जनसामान्यांचा मनामध्ये दुख आहे, की पक्षाने त्यांच्यावर अन्याय केला. शहराप्रमाणे ग्रामीण भागातही प्रिती बंड यांच्या नावाचा उत्साह मतदारांमध्ये संचारलेला आहे. त्यामूळे तिकीट नाही मिळाली याचा त्यांच्या उमेदवारीवर कुठलाच विपरीत परिणाम होत नाही.

**प्रश्न- प्रिती बंड यांना प्रहारचे समर्थन देण्यामागे राणा विरुध्द कडू असा वाद आहे का?**

**नैना कडू-**बच्चू कडू यांनी विधायक गोष्टीकरिता संपुर्ण महाराष्टात कुणालाच विरोध केला नाही. रवी राणा बच्चु कडूंच्या आंदोलनांवर बोलले, आंदोलन काढणे म्हणजे, प्रहार चा आत्मा काढण्यासारखे आहे. तसेच बच्चू कडूंचे सामर्थ्य काढण्यासारखे आहे. बच्चू कडूंनी प्रत्येक आंदोलन आपल्या जीवावर उदार होवून केले आहे, त्याला जर तुम्ही 'तोडीबाजी' म्हणत असाल, तर ती गोष्टी जिव्हारी लागण्यासारखी आहे. त्या प्रत्येक गोष्टीचे उत्तर बच्चू कडू यांनी दिले आहे. तुमच्या घरात येवून तुम्हाला मारेल, अशी धमकी जर कुणी देत असेल, तर कोणत्याही सामान्यातल्या सामान्य माणसाचा स्वाभिमान दुखाविल्या जाईल. याच्या व्यतिरिक्त कुठेही रवी राणांना काहीतरी बोलायचे आणि विरोध करायचा हा वाहायातपणा प्रहारच्या कार्यकर्त्यात आणि नेतृत्वात नाही. प्रिती बंड यांच्या विरोधात कुणीही असते, तरी आम्ही प्रितीताईच्या प्रचाराला आलो असतो.

**प्रश्न-विजयाचा विश्वास वाटतो म्हणून प्रिती बंड यांच्या पाठीशी आहात काय?**

**नैना कडू-**विजयाचा मार्ग हा शिवाजी महाराजांचा होता, हे यश राणा प्रतापांना नाही मिळाले. याचा अर्थ राणा प्रतापांना आपण शिवाजी महाराजांपेक्षा कमी लेखू शकत नाही. जिंकण्याआधी लढण्याची भूमिका महत्वाची असते, आणि प्रितीताई या लढण्याच्या भूमिकेत उभ्या आहेत. बडनेरा मतदारसंघात प्रिती बंड यांच्या 'ऑटो' या बोध चिन्हाने बडनेरा मतदारसंघात परिवर्तनाचा वेग पकडला आहे, यात दूमत नाही. जो कोणी चांगल्या तत्वासाठी लढेल, प्रहार सदानित त्यांच्या पाठीशी उभा असेल.

**प्रश्न-अचलपूर मतदारसंघाच्या प्रचाराकरिता तुमची काय भूमिका आहे?**

**नैना कडू-** अचलपूर मतदारसंघात गेल्या 30 वर्षांपासून बच्चू कडूंचे अखंडीत सेवाकार्य आहे. त्यामूळे त्यांचा मतदारच त्यांचा प्रचारक आहे. प्रहारचे कार्यकर्ते व मतदार यांनी ती निवडणूक आपली जबाबदारी म्हणून डोक्यावर घेतली आहे, त्यामूळे मला प्रचाराची धूरा सांभाळण्याची गरजच ठेवली नाही. महाराष्ट्रातील इतर उमेदवारांच्या प्रचारासाठी मात्र मी फिरत आहे.

# चांदूर रेल्वे मध्ये चहा बिस्कीटावर प्रशिक्षण

## जिल्हाभर जेवणाची व्यवस्था, चांदूर रेल्वेत 'भुखे भजन'



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे, ( दि.15 )-** धामणगाव रेल्वे मतदारसंघातील निवडणूक प्रक्रीयेच्या प्रशिक्षणाकरिता बाहेरगावाहून आलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचे फक्त चहा, बिस्कीटावर प्रशिक्षण घेण्यात आले. दिवसभर उपासी ठेवल्याने येथे आलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये रोष पहायला मिळाली. 'भूखे भजन न होय गोपाला' या म्हणी प्रमाणे उपाशीपोटी असल्याने निवडणूकीसंदर्भात दिलेली माहिती प्रशिक्षणात आलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या डोक्यावरुन गेली असल्याची भीती निर्माण झाली आहे.

विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील आठही मतदारासंघातील तालुकास्तरावर शासकीय अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, पोलीस, प्राध्यापकांचे प्रशिक्षण ठेवण्यात आले होते. मेळघाट, दर्यापूर, बडनेरा, अचलपूर, तिवसा, मोर्शी, अमरावती मतदारसंघाप्रमाणे चांदूर रेल्वे मतदारसंघातही हे प्रशिक्षण घेण्यात आले. चांदूर रेल्वे वगळता बाकी सर्व मतदारसंघात प्रशिक्षणाला आलेल्या प्रशिक्षणार्थींना जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती, परंतू चांदूर रेल्वेमध्ये फक्त चहा, बिस्कीटावर हे प्रशिक्षण घेण्यात आले. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून नियोजनाचा सर्व खर्च होत असताना चांदूर रेल्वेमध्ये जेवणाचे नियोजन का करण्यात आले नाही? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

मधुमेह, रक्तदाब व इतर आजार असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना उपाशीपोटी कामात जुंपल्याने कर्मचाऱ्यांमध्ये रोष व्यक्त होत आहे. याबाबत माहिती घेण्याकरिता चांदूर रेल्वेच्या एसडीओ राजश्री कोरे यांना संपर्क साधला असता, त्यांनी कॉल ला प्रतिसाद दिला नाही.



## तळेगाव पोलिसांचा गावठी दारूच्या दुकानावर धाड

**तळेगाव दशासर-** तळेगाव दशासर पोलिस ठाणे हद्दीतील बेलोरा व इतर गावांमध्ये विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गावठी दारूच्या गाळ्यांवर छापे टाकले. तीन कारवायांमध्ये पोलिसांनी 4 लाख 45 हजार रुपयांचा माल नष्ट केला आहे.

# तलवारीने वार करून हत्या

## माहुली जहाँगीर येथील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.15 ) -** दारू पिऊन झालेल्या वादानंतर शिविगाळ केल्याच्या कारणावरून तलवारीने हत्या केल्याची घटना समोर आली आहे. किशोर बैस (45, रा. माहुली) असे मृताचे नाव आहे. ही घटना 14 नोव्हेंबर रोजी दुपारी माहुली जहांगीर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. याप्रकरणात पुतण्या राजेश मोहनसिंग बैस (39) याच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी समाधान उर्फ रोहित भाऊराव इंगळे (22, रा. माहुली) याच्याविरुध्द खुनाचा गुन्हा दाखल करून त्याला 24 तासांत अटक केली.

किशोर बैस हे माहुली जहांगीर येथील वॉर्ड क्रमांक 3 मध्ये एकटे राहत होते. ते शेती करीत होते. त्याच्या मृत्यूची घटना समजताच पोलिसांनी तपास सुरू केला आणि किशोरचा रोजचा दिनक्रम शोधून काढला. किशोरला दारूचे व्यसन असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी तात्काळ त्याच्या रूममेट्सचा आणि घटनेच्या दिवशी त्याच्यासोबत असणाऱ्यांचा शोध घेऊन चौकशी केली. ज्यामध्ये आरोपी समाधान इंगळेच्या चौकशीत काही तफावत दिसून आली. त्यावर ग्रामीण गुन्हे शाखा पोलीस व माहुली जहांगीर पोलीस ठाण्याच्या पथकाने समाधान इंगळे याला विश्वासात घेऊन चौकशी केली. ज्यात त्याने किशोर बैस यांची हत्या केल्याची कबुली दिली.

### दारू पिऊन किरकोळ वाद

समाधान इंगळे यांनी पोलिसांना सांगितले की, घटनेच्या दिवशी तो आणि किशोर बैस यांनी एकत्र दारू पिले. दारू पिल्यानंतर किशोर बैस आणि समाधान यांच्यात क्षुल्लक कारणावरून वाद झाला. ज्यामध्ये किशोरने समाधानच्या आई आणि बहिणीला शिवीगाळ केली. त्यामुळे समाधान संतापला आणि त्याने घरातून तलवार आणून सपासप किशोरवर वार करून त्याचा खून केला. पोलिसांनी समाधान इंगळे याला अटक करून पुढील कारवाईसाठी माहुली जहाँगीर पोलिसांच्या ताब्यात दिले.

# शॉक लागून नियोजित वराचा मृत्यू

## तीन दिवसानंतर होता विवाह

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, ( दि.15 )-** तीन दिवसांवर विवाह होणार असतांना युवकाचा शॉक लागून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना मोर्शी तालुक्यातील ग्राम काटपुर ( ममदापूर ) येथे गुरुवारी (दि.14) ला सकाळी साडेदहा वाजता घडली. श्रीकांत मनोहर यावले (वय 29 ) असे मृतक युवकाचे नाव आहे. घराच्या छतावर कपडे वाळू घालण्यासाठी दोरी बांधत होता. दरम्यान घराच्या सर्विस लाईन च्या अँगल मध्ये जिवंत वीज प्रवाह असल्याने शॉक लागून श्रीकांतचा दुर्दैवी मृत्यू झाला.



श्रीकांत हा घराच्या छतावर कपडे वाळू घालण्यासाठी दोरी बांधण्यासाठी गेला होता. घराच्या अँगलला दोरी बांधत असताना विज प्रवाहाचा झटका लागल्याने जागेवरच तो कोसळला.

बाजूला असलेल्या मुलीने बघताक्षणी आरडा -ओरड करून आजूबाजूच्या लोकांना जमा केले. लगेच श्रीकांतला विद्युत प्रवाहाच्या संपर्कातून दूर करण्यात आले. तात्काळ त्याला सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र तेथील डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. श्रीकांत चा विवाह तीन दिवसावर येऊन ठेपला असताना, घरामध्ये उत्साह व चैतन्याचे वातावरण होते.

मात्र घरामधील हा उत्साह श्रीकांतच्या या दुर्दैवी मृत्यूमुळे क्षणभंगुर ठरला. श्रीकांतच्या या अकस्मात मृत्यूमुळे संपूर्ण यावले परिवार व गावामध्ये दुःखाचे सावट पसरले असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. त्याच्या पार्थिवावर हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी गावातील तसेच परिसरातील असंख्य नागरिकांनी श्रीकांत ला श्रद्धांजली दिली.

# व्यावसायिकाच्या खात्यातून 8.62 लाख रुपये काढले

## मोबाईल चोरीनंतर केला प्रकार


**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती ,( दि.15 )-** मोबाईल चोरी करून युपीआयद्वारे ऑनलाइन पैसे काढण्याच्या घटना जिल्ह्यासह शहरात वाढत आहेत. या 15 दिवसांत चार ते पाच प्रकरणे समोर आली आहेत. चौधरी चौकातील फुल मार्केटमधून एका व्यावसायिकाचा मोबाईल चोरीला गेल्याची घटना 31 ऑक्टोबर ते 14 नोव्हेंबर दरम्यान घडली होती. व्यापारी दिलीप मदनलाल साहू (66, शारदा नगर, लाठेबाई प्राथमिक शाळेजवळ) यांच्या फिर्यादीवरून शहर कोतवाली पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

दिलीप साहू हे 31 ऑक्टोबर रोजी दुपारी 1.30 वाजता चौधरी चौकातील फुल मार्केटमध्ये काही कामानिमित्त गेले होते. तेथून अज्ञात आरोपीने त्यांचा वन प्लस सीई 3 लाईट मोबाइल चोरला होता. मोबाईलमध्ये जिओ कंपनीचे सिम होते. जे बँक खात्याशी संलग्न होते. अज्ञात आरोपींनी दिलीप साहू आणि त्यांच्या पत्नीच्या खात्यातून मोबाईलद्वारे एकूण 8 लाख 62 हजार रुपये काढून दुसऱ्या खात्यात ट्रान्सफर केले. दिलीप साहू बँकेत गेले असता त्यांना खात्यातून पैसे काढल्याची माहिती समोर आली. 14 नोव्हेंबर रोजी दिलीप साहू यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध कलम 303 (2), 318 (4) अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# काँग्रेसच्या चमच्यांपासून सावध रहा!

## काँग्रेस भाजपवर प्रकाश आंबेडकरांचा हल्लाबोल | नांदगाव खंडेश्वर येथे जाहीर सभा





**महासागर प्रतिनिधी**

**नांदगाव खंडेश्वर, ( दि.15 ) -** अल्पसंख्यकांनी लोकसभेत काँग्रेसला भरभरून मते दिली, मात्र एनआरसी कायदा रद्द करण्यासाठी काँग्रेस मागे येते, हे फक्त मतासाठी मुस्लिम समाजाचा उपयोग करून घेतात. एनआरसी कायदा रद्द करायचा असेल तर निलेश विश्वकर्मा यांना निवडून द्या, काँग्रेसच्या चमच्यांपासून सावध रहा असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब उर्फ प्रकाश आंबेडकर यांनी नांदगाव खंडेश्वर येथे आयोजित जाहीर सभेत केले.

भाजप 'बटेंगे तो कटेंगे' हा नारा देवून मत मागत आहे. काँग्रेस सत्तेवर आल्यास हिंदूंवर अत्याचार होतील, असे त्यांचे म्हणणे आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांमध्ये ओबीसीचा मुद्दा थोतांड आहे. त्यांना ओबीसींना राजकारणातून संपवायचे आहे. या सर्व प्रश्नांवर लढण्यासाठी डॉ.निलेश विश्वकर्मा यांना निवडून द्यायचे आहे. राज्यात वंचितचे किमान 25 आमदार निवडून येणे आवश्यक आहे. राज्यात कुणाचेही सरकार आले, तरी त्यांना वंचित बहुजन आघाडीचा पाठिंबा घ्यावा लागेल, त्याशिवाय सरकार बसणार नाही. मतदार संघातील एक-एक मत खेचून आणा, तेव्हाच आपला आमदार निवडून येईल. पैगंबराबाबत वादास्पद बोलण्याचा अधिकार कोणालाही दिला नाही. निपुण शर्मा महिलेने वादग्रस्त विधान केले होते. तरी मुस्लिम समाज त्यांच्याच मागे आहे, असेही आंबेडकर यावेळी म्हणाले.

### 60 वर्षात मतदारसंघ अविकसित

वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ.निलेश विश्वकर्मा म्हणाले की, गेल्या साठ वर्षात कुठल्याही प्रकारचा विकास या मतदारसंघाचा झाला नाही. इतकेवेळा काँग्रेस व भाजप सत्तेत आली, परंतू या मतदारसंघात महिलांच्या हाताला काम नाही, मतदार संघात उद्योगधंदे निर्माण झाले नाही, यावर कुणी बोलायलाही तयार नाही. लाडकी बहीण योजनेवर विदर्भातील राजकारण तापत आहे, सत्ताधाऱ्यांनी 1500 देऊन महागाई वाढवली आहे. शेतकऱ्याच्या सोयाबीनला भाव नाही, तरी शेतकऱ्यांना मतं मागताहेत. या मतदारसंघात परिवर्तनाकरिता तिन्ही तालुक्यांनी एकत्र येत मला विधानसभेवर पाठवावे असे आवाहन डॉ.निलेश विश्वकर्मा यांनी यावेळी केले. सभेला मधुकरराव शेलार, एड.प्रियदर्शी तेलंग, सिद्धार्थ भोसले, प्राजक्ता पिल्लेवान, प्रशांत नाईक, रवींद्र मेंढे, जी.पी.विश्वकर्मा, अनिल भुरभुरे, रोशन गाडेकर, मिलिंद शिंदे, नासिर खान, ताराचंद विश्वकर्मा, हरिदास देठे, गणेश क्षार, अण्णा डांगे, संतोष महाराज (पोहरा देवी) यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

# आज खा. राहुल गांधी यांची जुना धामणगावात महासभा

**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे, ( दि.15 ) -** लोकसभेतील विरोधी पक्ष नेते तथा काँग्रेसचे नेते राहुल गांधी हे आज दि 16 नोव्हेंबरला धामणगाव रेल्वे येथे येणार असून काँग्रेसचे नेते व महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ जुना धामणगाव येथील डॉ.मुकुंदराव पवार शाळेच्या बाजूला असलेल्या मैदानावर सकाळी 10 वाजता जाहीर सभा होणार आहे या सभेला ते संबोधित करतील.

दरम्यान या सभेकरीता राहुल गांधी हे हेलिकॉप्टरने येणार असून जुना धामणगाव येथे हेलीपॅड तयार करण्यात आले आहे.



धामणगाव रेल्वे विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेसचे नेते व महाविकास आघाडीचे उमेदवार प्रा.वीरेंद्र जगताप यांच्या प्रचारार्थ ही सभा होत असून यावेळी महविकास आघाडीचे उमेदवार बबलू देशमुख, ॲड.यशोमती ठाकूर, माणिकराव ठाकरे, वसंत पुरके, रणजित कांबळे, मयुरा अमर काळे, सुनील खराटे, गिरीश कराळे, डॉ.सुनील देशमुख, डॉ.हेमंत चिमोटे, गजानन लवटे यांच्या प्रचारार्थ लोकसभेतील विरोधी पक्ष नेते तथा काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांची जाहीर सभा येथील जुना धामणगाव येथील मैदानावर होणार आहे. तरी या सभेला उपस्थित राहण्याचे आवाहन काँग्रेस व महाविकास आघाडीतर्फे करण्यात आले आहे.

या अगोदर महविकास आघाडी तर्फे चांदुर रेल्वे येथे कन्हैय्या कुमार, तर नांदगाव खांडेश्वर येथे सुषमा अंधारे यांची सभा झाली होती, या सभेत गर्दी होणार असल्याने सुरक्षा यंत्रणा व इतर बंदोबस्त करण्यात आला आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# निवडून येण्याची खात्री असणाऱ्यांना धक्का देणारा धामणगाव मतदारसंघ

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे,( दि.15 )**- धामणगाव विधानसभा मतदार संघ हा धक्कादायक निर्णय देणारा मतदार संघ म्हणून ओळखल्या जातो. निवडून येण्याची खात्री असणाऱ्यांना धक्का देणाचं काम धामणगाव विधानसभा मतदार संघाने अनेकदा केले आहे. नोव्हेंबर 2024 ची निवडणुक 14 वी पंचवार्षिक निवडणुक होत आहे. या निवडणुकीत 24 उमेदवार निवडणुक रिंगणात असुन भाजप, काँग्रेस व वंचित बहुजन आघाडी यांच्यात तिरंगी लढत पहायला मिळत आहे.

1962 साली अस्तित्वात आलेल्या चांदूर रेल्वे मतदार संघात तिवसा, चांदूर रेल्वे व धामणगाव रेल्वे यांचा समावेश होता. महाराष्ट्र विधानसभा 1962 च्या निवडणूकीत काँग्रेसचे भाऊराव गुलाबराव जाधव 31 हजार 25 मतांनी निवडून आले होते. त्यांचे प्रतिस्पर्धी सुदामकाका देशमुख (भाकप) यांना 19,052 मते व जनार्दन अडसड यांना 6,908 मते मिळाली होती. 1967 च्या निवडणुकीत भाऊराव जाधव (काँग्रेस) यांनी बाजी मारली. त्यांना 28,427 मते, त्यांचे प्रतिस्पर्धी रिपाइंचे एफ.बी. मोरे यांना 17,993 मते मिळाली होती. 1972 च्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने शरद तसरे यांना उमेदवारी दिली. तसरे 48,403 मताधिक्क्याने विजयी झाले. ही निवडणूक एकतर्फी झाली होती. 1978 च्या निवडणुकीत काँग्रेसने नवीन उमेदवार सुधाकर सव्वालाखे यांना उभे केले. त्यांनी या निवडणुकीत 52,622 मते प्राप्त करून विजय मिळविला. त्यांचे प्रतिस्पर्धी अरूण अडसड हे जनता पक्षाच्या वतीने रिंगणात होते. 1980च्या निवडणुकीत काँग्रेसच्या पक्षाच्या उमेदवारीवर ?ड. यशवंत शेरेकर यांनी निवडणुक लढविली. शेरेकर यांनी 31,715 मते घेऊन विजयी झाले. त्यांचे प्रतिस्पर्धी भाजपचे अरूण अडसड यांना 12,409 मतांवर समाधान मानावे लागले. त्यानंतरच्या 1985 च्या निवडणुकीतही काँग्रेसचे ॲड. यशवंत शेरेकर 32,156 मते घेऊन विजयी झाले. त्यांचे प्रतिस्पर्धी भाजपचे अरूण अडसड यांना 28,138 मते मिळाली. 1990 च्या निवडणुकीत भाजपचे अरूण अडसड 36,204 मतांनी विजयी झाले. या निवडणुकीत यशवंत शेरेकर (काँग्रेस) यांना 23,997 मते मिळाली. 1995 च्या निवडणुकीत जनता दलाचे डॉ. पांडुरंग ढोले हे 36,863 मते प्राप्त करून विजयी झाले. 1999 च्या निवडणुकीत भाजपचे अरूण अडसड 32,252 मते प्राप्त करून विजयी झाले. त्यांचे प्रतिस्पर्धी काँग्रेसचे प्रा. वीरेंद्र जगताप (30,479) व जनता दलाचे डॉ. पांडुरंग ढोले (25,492) यांचा पराभव केला. 2004 निवडणुकीत काँग्रेसतर्फे प्रा. वीरेंद्र जगताप यांनी 45,536 मते घेऊन बाजी मारली.







### काँग्रेसचे 9 वेळा नेतृत्व

| | |
|---|---|
| काँग्रेस | - 09 |
| भाजप | - 03 |
| जद | - 01 |

### 2009 मध्ये मतदार मतदारसंघाची पुनर्रचना

2009 च्या निवडणुकीपूर्वी विधानसभा मतदार संघाच्या पुनर्रचनेत चांदूर रेल्वे, धामणगाव व नांदगाव खंडेश्वर तालुक्याचा समावेश करण्यात आला. या सोबतच मतदार संघाचे नामांतर करून धामणगाव मतदार संघ करण्यात आले. 2009 च्या निवडणुकीत काँग्रेसचे प्रा. वीरेंद्र जगताप यांनी 72,755 मते प्राप्त करून विजय संपादन केला. त्यांचे प्रतिस्पर्धी भाजपचे अरूण अडसड यांना 59,307 मते व डॉ. पांडुरंग ढोले (बसपा) यांना 29,544 मते मिळाली. 2014 च्या विधानसभा निवडणूकीत मोदी लाटेत व प्रत्यक्ष प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची प्रचंड प्रचार सभा चांदूर रेल्वे झाली असतांना मतदारांनी भाजपचे अरूण अडसड यांना धक्का देत पुन्हा काँग्रेसचे वीरेंद्र जगताप यांना 975 मतांनी निवडून आले. वीरेंद्र जगताप यांना 70,879 मते मिळाली. तर भाजपचे अरूण अडसड यांना 69,905 मते मिळाली. 2019 च्या निवडणुकीत जबरदस्त तिरंगी लढत पाहायला मिळाली असुन प्रथमच निवडणुक लढणारे प्रताप अरूण अडसड यांनी 90 हजार 833 मते घेत 15 वर्ष आमदार असणारे प्रा. वीरेंद्र जगताप यांचा 9 हजार 517 मतानी पराभव केला. प्रा. वीरेंद्र जगताप यांना 81 हजार 316 मते मिळाली. तर पहिल्या निवडणुकीत दमदार एन्ट्री करीत निलेश विश्वकर्मा यांना 23 हजार 780 मते मिळाली होती. 2024 च्या निवडणुकीत महायुतीकडुन भाजपाचे आमदार प्रताप अडसड, महाविकास आघाडीकडुन काँग्रेसचे प्रा. वीरेंद्र जगताप आणि वंचित बहुजन आघाडीचे डॉ.निलेश विश्वकर्मा निवडणुक रिंगणात आहे. 2024 ची निवडणुक तिरंगी होणार असुन मतदार राजाचा कल कोणाकडे राहणार याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

# प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजावावा-एसडीओ

**महासागर प्रतिनिधी**
**अचलपूर,( दि.15 )** -लोकसभा निवडणुकीत अचलपुर विधानसभेची टक्केवारी 68 होती. ती टक्केवारी आणखी कशी वाढेल या दृष्टीने प्रत्येकानेच प्रामाणिक प्रयत्न करावे. विद्यार्थ्यांनी सुध्दा आपल्या आईवडीलासह इतर नातेवाईकांना विचारणा करावी की ,आपले मतदार यादीत नाव आहे कींवा नाही ? एवढेच नव्हेतर निवडणुकीच्या दिवशी आपल्या आई, बाबा, भाऊ, काका, काकु यांनी मतदानाचा हक्क बजावला की नाही याची खातरजमा करावी केले नसल्यास त्यांना मतदानाचा हक्क बजावा असे आवाहन निवडणुक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (एसडीओ) बळवंत अरखराव यांनी केले.

मतदारांमध्ये मतदानासंबंधी प्रभावी जनजागृती व्हावी या दृष्टीने अचलपुर विधानसभा मतदार संघात स्विप अंतर्गत गेल्या महिण्याभऱ्यात विविध कार्यक्रम रॅली आणि स्पर्धांचे आयोजण करण्यात आले होते. त्या अनुषंगाने येथील सुबोध हायस्कूल येथे प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांना बक्षिस वितरणाचा कार्यक्रम घेण्यात आला या प्रसंगी अरखराव बोलत होते. यावेळी व्यासपिठावर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव, तहसिलदार डॉ. संजय गरकल, गटविकास अधिकारी सुधिर अरबट, नगरपालिका मुख्याधिकारी धिरज गोहाड, पालिका शिक्षण प्रशासन अधिकारी आशिष किटुकले, सुबोध हायस्कुलचे मुख्याध्यापक संजय चौबे, केंद्रप्रमुख निळकंठ दलाल, वैभव दिवाकर सह आदी मान्यवर उपस्थित होते.



# डॉ.अबरार यांचे डॉ.सुनिल देशमुखांना समर्थन



### जीविताला भीती असल्याची दिली होती तक्रार

सय्यद अबरार यांनी आपल्या जीविताला धोका असल्यासंदर्भात पोलीस आयुक्तांकडं तक्रार दिली होती. आज त्यांना पोलिसांकडून विशेष सुरक्षा प्रदान करण्यासंदर्भात निर्णय घेतला जाणार होता. मात्र, अबरार यांनी तक्रार मागं घेत, सकाळीच काँग्रेसचे उमेदवार सुनील देशमुख यांना आपला पाठिंबा जाहीर केला, असं पत्रकार परिषदेत सांगण्यात आलं.

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.15 )** - राज्यात महाविकास आघाडी आणि महायुती या दोन्हीच्या विरोधात असणाऱ्या %परिवर्तन महाशक्ती%चे (तिसरी आघाडी) अमरावती विधानसभा मतदारसंघातील उमेदवार सैय्यद अबरार यांनी काँग्रेसचे उमेदवार सुनील देशमुख यांना जाहीर पाठिंबा घोषित केला. सैय्यद अबरार यांच्या या निर्णयामुळं अमरावतीमध्ये मतदारसंघात काँग्रेसची ताकद वाढली आहे.

अमरावती शहरातील पश्चिम भागात मोठ्या संख्येनं वसलेल्या मुस्लिम बांधवांना न्याय मिळावा, या उद्देशानं बच्चू कडू यांनी आपल्या पक्षाच्या वतीनं मुस्लिम व्यक्तीला उमेदवारी देण्याचा निर्णय घेतला. एकूण 8 जणांनी उमेदवारीसाठी इच्छा दर्शवली. या 8 पैकी सय्यद अबरार हे अतिशय चांगले व्यक्ती असल्यामुळं बच्चू कडू यांनी त्यांना उमेदवारी दिली. असं असताना सय्यद अबरार यांनी अचानक काँग्रेसला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. परंतू हा समर्थन देण्याचा निर्णय प्रहारचा नसल्याचे स्पष्टीकरण प्रहार पक्षाचे प्रदेश प्रवक्ता जितू दुधाने यांनी पत्रकार परिषदेत दिले.

# चांदूर रेल्वे पोलिसांचा पोलीस अधीक्षक कडून सत्कार



**महासागर प्रतिनिधी**
**चांदुर रेल्वे,( दि.15 )** - सध्या होत असलेल्या निवडणुकीच्या धामधुम व वाढलेल्या कामाचा ताण असून सुद्धा तालुक्यात घडलेल्या विविध गुन्ह्याचा छडा लावल्याने पीएसआय सुयोग महापुरे, हेड कॉन्स्टेबल शिवाजी घुगे, प्रवीण मेश्राम, व काही अंमलदार यांना पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी दखल घेत त्यांचा सत्कार केला. मागील काही दिवसात तालुक्यातील ग्रामीण भागात चोरीचे विविध प्रकरण घडले होते, पण स्थानीय पोलिसांनी झालेल्या चोरीच्या प्रकरणांची दखल घेत चोरीच्या अनेक घटना उघडकीस आणल्या. केलेल्या या कारवाई ची पोलीस अधीक्षकांकडून दखल घेण्यात आली.या सत्कारामुळे येथील पोलिसांचे आत्मबल, सोबतच मनोबल वाढले असल्याचे दिसून येत आहे.



## गोवंश वाहतुक करताना वाहनाला पकडले

**अमरावती** - गोवंश जनावरांची वाहतुक करणार्या एका वाहनाला कोडेंश्वर रोडवरील के के करण बार समोर पकडण्यात आले. बडनेरा पोलिसांनी 13 नोव्हेबर रोजी ही कारवाई केली. याप्रकरणात पोलिस हवालदार इरफान रायलीवाले यांच्या तक्रारीवरून बडनेरा ठाण्यात आरोपी सैय्यद आकीब सैय्यद अफसर (22, रा. मोहम्मदिया नगर, जुनीवस्ती, बडनेरा) व शेख वसिम शेख हाफीज (24,रा. पटेलनगर, जुनीवस्ती, बडनेरा) यांच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

# ही लढाई जाती व धर्मासाठी नसून शेवटच्या माणसाच्या हक्कासाठी आहे!

## बच्चू कडू करजगाव येथील सभेने मोडला गर्दीचा विक्रम



**महासागर प्रतिनिधी**
**चांदुर बाजार,( दि.15 )**- सामान्य नागरिकांच्या मतांमध्ये मोठी ताकद आहे, एका मताने सत्ता परिवर्तन होऊ शकते तर तुमच्या एका मताने दिव्यांग मंत्रालय स्थापन स्थापन करता येऊ शकते असे मत परिवर्तन महाशक्तीचे उमेदवार प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक बच्चू कडू यांनी करजगाव येथील प्रचार सभेत केले. सध्या विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून अचलपूर विधानसभा मतदार संघाचे परिवर्तन महाशक्तीचे उमेदवार बच्चू कडू यांचा मतदार संघात मोठया उत्साहात प्रचार सुरू आहे.

गुरुवारी सायंकाळी चांदुर बाजार तालुक्यातील करजगाव येथे प्रचार रॅली व सभेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी करजगाव येथील सभेत रमेशराव भेंडे, संजाबराव कविटकर, ऊकंडराव नागोसे, प्रसन्ना वाकोडे, गजेंद्र दहिकर, दामुभाऊ उमक, रामभाऊजी ठाकरे, तैयब भाई,जावेद खान, पठाण झाकीर हाजी, मोहसिनभाई, जमील सर, तस्लिम भाई, जावेद भाई, महेमूद भाई, जमील भाई, मुबारिक भाई, रमेश सोनार, बाळा धाडसे, अमित शिरभाते यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलतांना बच्चू कडू म्हणाले की, प्रहारचा झेंडा हा समाजसेवेचा झेंडा आहे. अचलपूर मतदार संघात कोट्यवधींची विकासकामे, दिव्यांग मंत्रालय निर्माण करणे हे केवळ तुमच्या सारख्या सुज्ञ जनतेच्या सहकार्याने शक्य झाले आहे. कामगार, शेतकरी, शेतमजूर यांच्या पाठीशी सदैव उभा राहून त्यांच्यासाठी आपला अविरत लढा सुरूच आहे. शिवाय विविध धार्मिक कार्यात सुद्धा आपण महाराष्ट्रातील ईतर आमदारांच्या पुढे असून आपल्या मतदार संघात शेकडो कोटी रुपये धार्मिक स्थळांच्या जीर्णोद्धारासाठी उपलब्ध केले. एवढेच नाही तर करजगांव येथील कार्तिक स्वामी मंदिराला 'ब' वर्ग दर्जा प्राप्त करून देत तीन कोटी रुपये मंदिराच्या विकासासाठी उपलब्ध करून दिले, यामुळे मंदिराचा कायापालट सुरू असल्याचे देखील ते म्हणाले.

बच्चू कडू यांचा करजगाव भागात प्रचाराचा झंझावात सुरू आहे. गुरुवारी त्यांनी दोन्ही गावातील मंदिरात जाऊन दर्शन घेत प्रचार यात्रेला सुरुवात केली, त्यांनतर त्यांची जंगी सभा पार पडली. या सभेमध्ये जमलेल्या गर्दीने बच्चू कडू यांच्या विजयाचे चित्र स्पष्ट असल्याचे जाणवत होते. यावेळी ठिकठिकाणी महिलावर्गांनी बच्चू कडू यांचे औक्षण करीत त्यांना शुभकामना दिल्या. चौकाचौकात त्यांचे जंगी स्वागत करून कार्यकर्त्यानी व नागरिकांनी विजयाच्या घोषणा दिल्या. यावेळी प्रहार जनशक्ती पक्षाचे सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी व नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

# विकासासाठी घड्याळाला मतदान करा!

## लोणी येथील सभेत देवेंद्र भुयारांचे मतदारराजाला आवाहन

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड, ( दि.15 )**- वरुड-मोर्शी विधानसभेच्या विकासाकरिता मागील 5 वर्षात 4372 कोटी रुपयांचा निधी शासनाकडून खेचून आणत आपण मतदार संघाचा कायापालट करण्यात मी अग्रेसर आहे. त्यामुळे पुन्हा एकदा मतदार संघाच्या विकासासाठी मला निवडून आणण्यासाठी मतदारराजाने विकासाला मतदान करत, राष्ट्रवादीच्या घड्याळामागे उभे राहण्याचे आवाहन लोणी येथे आयोजित एका सभेत आमदार देवेंद्र भुयार यांनी मतदारांना केले.

गुरुवारी (दि.14) सायंकाळी 7 वाजता झालेल्या या सभेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या सुरेखा ठाकरे उपस्थित होत्या. गेल्या 5 वर्षात देवेंद्र भुयारच या मतदारसंघाचा विकास करू शकतात याची शाश्वती असल्यामुळे देवेंद्र भुयार यांचं विकासाचं पारड जड झालं आहे. उर्वरित उमेदवाराजवळ कोणताही ठोस मुद्दा नसल्यामुळे त्यांची प्रचारात आघाडी दिसून येत नसल्याचे चित्र या निवडणुकीदरम्यान पहावयास मिळत आहे.

मागील 30 वर्षाच्या काळात हर्षवर्धन देशमुख यांचे आमदारकीचे 15 वर्षे नरेशचंद्र ठाकरे यांचे पाच 5 वर्षे व डॉ.अनिल बोंडे यांचे 10 वर्षाच्या काळात जेवढा निधी वरूड - मोर्शी मतदार संघात आला नाही. त्याहीपेक्षा जास्त निधी मागील पाच वर्षाच्या काळात देवेंद्र भुयारांनी खेचून आणला. त्यातही दोन वर्ष कोरोनामध्ये गेले, अन्यथा पाच वर्षाच्या काळात देवेंद्र भुयारांनी विकासाची गंगा या मतदारसंघात आणली असती ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे मतदार संघाचा चेहरा-मोहरा बदलण्यात ते एकमेव आमदार ठरले असल्याचे बोलले जात आहे. म्हणूनच की काय? या निवडणुकीदरम्यान आमदार देवेंद्र भुयार हे कोणत्याच मुद्द्यावर मत न मागता केवळ विकासाच्या मुद्द्यावर जनतेला मत मागत असल्याचे लोणी येथील जाहीर सभेत दिसून आले आहे. विकासाला मत द्या, विकासासाठी घड्याळासाठी निवडून द्या असे आव्हान देवेंद्र भुयार के मतदारांना करीत आहे त्यामुळे मतदार या आव्हानाला साथ देणार हे लोणी येथील उपस्थित अफाट जनसमुदायातून दिसून आले. विकासाच्या मुद्द्यावर देवेंद्र भुयारांचे पारडे प्रचारात जड झाले आहे. याउलट भारतीय जनता पार्टीचे उमेदवार चंदू यावलकर, महाविकास आघाडीचे उमेदवार गिरीश कराळे व अपक्ष उमेदवार विक्रम ठाकरे यांच्याजवळ प्रचारात विकासाच्या मुद्द्याला बगल देऊन प्रचार होत असल्यामुळे मतदार त्यांना साथ देणार का? याकडे सर्वसामान्य जनतेचे लक्ष लागले आहे.





# महाराष्ट्र युवक नाभिक महासंघाचा यशोमती ठाकूर यांना पाठिंबा

## सर्व समाजाच्या प्रगतीसाठी कटिबद्ध- यशोमती ठाकूर



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.15 )**- महाराष्ट्र युवक नाभिक महासंघाने तिवसा येथील महाविकास आघाडीच्या उमेदवार यशोमती ठाकूर यांना जाहीर पाठिंबा दिल्याचे पत्र नुकतेच ठाकूर यांना दिले आहे. या पाठिंब्यामुळे आपली शक्ती वाढली असून सर्वच समाजाच्या प्रगतीसाठी आपण नेहमीच कटिबद्ध राहू, असे अभिवचन यावेळी यशोमती ठाकूर यांनी उपस्थितांना दिले. महाराष्ट्र युवक नाभिक महासंघाचा महाविकास आघाडीचे उमेदवार यशोमती चंद्रकांतजी ठाकूर यांना जाहिर पाठींबा असल्याचे पत्र नुकतेच जारी करण्यात आले आहे. सदर पाठिंब्याचे पत्र निवासस्थानी जाऊन यशोमती ठाकूर यांना देण्यात आले. या पत्रामध्ये नाभिक समाजाने यशोमती ठाकूर यांनी केलेल्या सहकार्य व त्यांच्या दूरदृष्टीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे.

### नाभिक समाजाच्या मागणीला न्याय दिला

नाभिक समाजाचे आराध्य दैवत संत सेनाजी महाराज यांचे भव्यदिव्य समाज मंदिर बांधून नाभिक समाजाच्या मागणीला न्याय दिला. तसेच अमरावती लोकसभा मतदार संघाचे खासदार बळवंत वानखडे यांच्या निधीमध्ये हुतात्मा भाऊ कोतवाल सभागृह कौंडण्यपूर येथे रिकाम्या जागेवर विशाल सभागृह बांधण्याचे आश्वासन दिले आहे. यशोमती ठाकूर आपल्या शब्दावर ठाम असतात हा विश्वास असल्याने महाराष्ट्र युवक नाभिक महासंघाचे अध्यक्ष संजय पाटील यांनी सर्वानुमते यशोमती ठाकूर यांना जाहिर पाठिंबा दिला. समाजातील सर्व स्तरातून यशोमती ठाकूर यांना समर्थन मिळत असल्याने त्यांची दावेदारी आता भक्कम झाली आहे.